# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, कोल्हापूर

# Maharashtra Energy Development Agency (MEDA)
(Government of Maharashtra Institution)
Divisional Office, Kolhapur


२०२३/वि.का.को/ तांत्रिक/कार्या-१/S-२०/435 दिनांक :- ०७/०६/२०२३

प्रति,

मे.विघ्नहर्ता सोलार एनर्जी,
बसस्थानकाजवळ, हिंगणगाव,
ता.कवठेमहांकाळ जि.सांगली

विषय:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सांगली येथे आस्थापित ०५कि.वॅ क्षमतेचा पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प कार्यान्वित करण्यास असमर्थ ठरल्याने मे.विघ्नहर्ता सोलार एनर्जी यांचा कार्यादेश रद्द करुन त्यांचा काळ्या यादीत समावेश करणेबाबत.

संदर्भ:- १) कार्यादेश क्र.SOLAR-२/KOP/GCRT/SWS/SR-१३/२०२१/७२० दि.१०/१२/२०२०

२) या कार्यालयाचा ई-मेल दि.२४/०५/२०२२

३) या कार्यालयाचा ई-मेल दि.२३/०६/२०२२

४) या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र. २०२३/वि.का.को/ तांत्रिक/कार्या-१/३४० दिनांक :- २४/०४/२०२३

उपरोक्त संदर्भ क्र.०१ येथील कार्यादेशान्वये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सांगली येथे आपण आस्थापित केलेला ०५ कि.वॅ क्षमतेचा पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प कार्यान्वित करुन देणेबाबत आपणास संदर्भ क्र.२ व ३ अन्वये या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.शिवाय सदर बाब आपणास दुरध्वनी व ई-मेलव्दारे वारंवार कळविण्यात आलेली आहे.परंतू सदर प्रकरणी आपणाकडून पूर्ण दुर्लक्ष झाले असून प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत कोणतीही प्रगती होताना दिसत नाही.

सदर ठिकाणी नेट मीटर आस्थापनेबाबत आपणाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे संबधित लाभार्थी संस्थेस सौर विद्युत प्रकल्पाचा लाभ आजपावेता घेता आलेला नाही व त्यामुळे त्यांना वीज बीलाचा नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे. शिवाय या परिस्थितीमुळे महाऊर्जाची नाहक बदनामी होत असून योजनेचे नाव देखील खराब होत आहे.

या प्रकरणी आपण लाभार्थी संस्था व महावितरण कंपनीकडे आवश्यक पाठपुरावा करीत नसल्याने सदर प्रकल्पांचे नेट मीटर आस्थापित होण्यास नाहक विलंब होत आहे. तेव्हा या सर्व प्रकारामुळे होत असलेल्या नुकसानीस आपणास जबाबदार धरून आपणावर दंडात्मक कारवाई करून आपली सुरक्षा ठेव रक्कम व उर्वरित देयकाची रक्कम जप्त करून आपला समावेश काळ्या यादीत का करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा दि. २७/०४/२०२३ पर्यंत या कार्यालयास सादर करणेबाबत संदर्भ क्र.०४ अन्वये आपणास कळविण्यात आले आहे.


विभागीय कार्यालय : सि. स. नं. २४९/अ-१/५५, ई वॉर्ड, म्हाडा कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, जिल्हा परिषदेजवळ, कोल्हापूर - ४१६००३
www.mahaurja.com Email : medakolhapur@mahaurja.com Ph : (0231) 2680009

तथापि आपलेकडून सदर प्रकरणी आजपावेता कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. यावरुन उक्त प्रकरणाचे आपणास कसलेही गंभीय नसल्याचे स्पष्ट होते. तेव्हा सदर बाबींचा विचार करता विषयांकित प्रकल्पाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यास आपण इच्छूक नसल्याचे ग्राहय धरुन व या सर्व प्रकारामुळे होत असलेल्या नुकसानीस व महाऊर्जाच्या होत असलेल्या बदनामीस आपणास जबाबदार धरून संदर्भ क्र.१ अन्वये दिलेला कार्यादेश रद्द करण्यात येत असून त्याअंतर्गत असणारी प्रलंबित काम विचारात घेता सदर प्रकल्पातील महाऊर्जाकडे कार्यादेशातंर्गत देय असणारी रक्कम, जमा सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येत आहे.

तसेच मे.विघ्नहर्ता सोलार एनर्जी,सांगली यांचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येत असून सदर कंपनीस यापुढे महाऊर्जाकडून प्रसिध्द होणाऱ्या कोणत्याही निविदा/दरपत्रकाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

( समुद्रगुप्त पाटील )
विभागीय महाव्यवस्थापक
महाऊर्जा, विभागीय कार्यालय, कोल्हापूर

प्रत –

१. महाव्यवस्थापक (सर्व)
महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,
औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,
पशुसंवर्धन आयुक्तालय शेजार,
औंध, पुणे – ४१६ ००७ --------------- यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.

२. प्रादेशिक संचालक/विभागीय महाव्यवस्थापक/ व्यवस्थापक,
सर्व महाऊर्जा प्रादेशिक/विभागीय/जिल्हा कार्यालये, --------------- यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.

३. उपायुक्त तथा सदस्य,
जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,सांगली --------------- यांना माहितीस्तव सादर.